# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०८/०४/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### फसवणुक

१) **पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०.५ कि मी अंतरावरील कन्हान वैष्णवी ऑप्टीकल समोरील रोडवर येथे दिनांक ०७/०४/२०२२ चे ११.०० वा. ते १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मंजुळा वामनराव डेंगे वय ६५ वर्ष रा. राधाकृष्ण नगर, कन्हान ही रस्त्याने पायदळ जात असतांना अज्ञात आरोपी महिलेने फिर्यादीस हाक मारून 'तुम्ही अमोल डेंगे च्या आई आहात का, कुठे जात आहात?' असे विचारून 'मि तुम्हाला कोरोनाचे पैसे मिळवुन देते, त्याकरीता तुम्हाला सरकारी दवाखाना कामठी येथे यावे लागेल' असे म्हणुन रस्त्याने जाणारी रिक्षा थांबवुन त्या रिक्षा मध्ये बसुन सरकारी दवाखाना समोर कामठी येथे उतरले व सरकारी दवाखान्यात गेले तेथे गेल्यावर आरोपीने कोरोनाचे पैशे काढुन देण्यासाठी साहेबांना ५,०००/—रू. दयावे लागतात पैशे नसतील तर सोन्याचे दागिने दिले तरी चालतील असे बोलली असता फिर्यादीने तीच्या गळयातील जुने वापरते सोन्याचे दागीने किमती १६,२५०/—रू. चा माल आरोपी महिलेस दिला ती घेवुन महीला साहेबांची सही घेवुन येतो असे सांगुन निघुन गेली. परंतु ति महिला आरोपी परत आली नाही व फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो.न. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

२) **पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत मौजा धापेवाडा येथे सप्टेंबर २०२१ ते दिनांक ०७/०४/२०२२ पर्यंत आरोपी क्र. १) गुडडु उर्फे कृष्णाकुमार वाळके व त्याचे इतर साथीदार नामे २) अमित धर्मराज वाकडे रा. धापेवाडा ३) श्रुती देवानंद वाट रा. शिवा ता. जिल्हा नागपुर ४) गौरव किशोर गराडे रा. आंबेडकर वार्ड रामटेक ५) पुडंलिक देवराव पठारे रा. मारवाडी पोस्ट राहडा ता. पुसद यवतमाळ ६) सिंध्दात प्रकाश चव्हान रा. गोपाल नगर नागपुर यांनी संगणमत करून फिर्यादीसह इतर १८ लोकांनकडुन ओरीजनल आधार कार्ड, पॅन कार्ड, फिर्यादीचे पतीनी चा मृत्युचा दाखला, राशन कार्ड, बॅकेचे सही केलेले कोरे चेक अशी कागदपत्रे गोळा करून शासकीय निधी मिळवुन देतो असे सांगुन सदर कागद पत्रा सोबत बनावट लाभार्थी कार्ड व खोटे प्रतिज्ञापत्र तयार करून त्याचेवर परस्पर खोटया सहया करून सदर बनावट दस्ताऐवज शासनाकडे सादर केले. यांनतर आरोपीतांनी शासकिय पैसे मंजुर करून सदर बाबत आम्हाला खोटी माहिती सांगुन शासकिय योजनेतुन प्रत्येकी सुमारे २,३४,०००/—रू. एवढे पैसे मंजुर करवुन घेवुन ते पैसे बॅकेत जमा होताच त्यातील प्रत्येकी लोकान मागे जवळ पास २,००,०००/—रू. स्वता बॅकेत सोबत जावुन घेतले. तरी यातील आरोपी फिर्यादी सह एकुण १८ लोंकाना विश्वासघात घेवुन फसवणुक करून सदर पैसे स्वताकडे घेवुन स्वताकडे वैयक्तीक आर्थिक फायदा करीता वापर करून फिर्यादी व साक्षीदार तसेच शासनाची ४२,१२,०००/—रू. ची आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्रीमती माला रत्नाकर कोहाड, वय ४९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४ धापेवाडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४०६, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) भादंवि.

कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मारुती मुळूक ९५५२५६४०४७ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ७ कि.मी अंतरावरील मौजा हेटी येथे दिनांक ०७/०४/२०२२ चे १८:०० वा. दरम्यान फिर्यादीचा पती नामे– **अमरलाल सददु धुर्वे(मृतक) वय ३५ वर्षे, वार्ड क्र. ०३ झोपडपट्टी हेटी ता. सावनेर** हा दारू पिण्याच्या सवयीचा असल्याने त्याने बाबरीचा झाडाला दोरी बांधुन गळफास घेतल्यानंतर मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रीमती रेखा अमरलाल धुर्वे, वय २६ वर्षे, वार्ड क्र. ०३ झोपडपट्टी हेटी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार गुप्ता मो. क्र. ९५११२४७२६१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर